गोदातीर दि. 03/02/2023

# इस्लापुरात जनावरांची निर्दयी वाहतूक करणारा पिकअप, तर सारखणीत गोमांस नेणारा ट्र

नांदेड-गोवंशाची चोरी करून ती कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या टोळीला इस्लापूर पोलिसांनी दि.१ रोजी दुपारी बाराच्या सुमारास अटक केली. त्यांच्याकडील जवळपास आठ गोवंश मुक्त केले. चार जणांविरुद्ध इस्लापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

इस्लापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रघुनाथ शेवाळे हे एक फेब्रुवारी रोजी गस्तीवर होते. गोपनीय माहितीच्या आधारे हिमायतनगर ते तळ्ळारी रस्त्यावर सापळा लावून महिंद्रा पिकअप क्रमांक (टीएस२०टी-१८४६) आणि (एमएच २६-बीई-२८ २१) या दोन वाहनांना तपासणीसाठी थांबविले. यावेळी गोवंश निर्दयीपणे पाय बांधलेल्या अवस्थेत दिसून आले. पोलिसांना पाहताच वाहनातील काही जण पसार झाले. मात्र पोलिसांनी साहिलखान मकबूल खान (वय १९), शेख अरबाज शेख पाशा, युनूस खान अयुब खान (वय ३४) आणि साहिल खान सर्व रा. हिमायतनगर यांना अटक केली. तेलंगणात ही गोवंश कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती अटक केलेल्या आरोपींनी पोलिसांना सांगितली. सहाय्यक पोलीस निरीक्षक रघुनाथ शेवाळे यांच्या फिर्यादीवरून वरील चारही जणांविरुद्ध प्राण्यांना क्रुरतेने वागवण्याचा कायदा १९६० कलम ११(१) सह ३४ भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक बोधगिरे करत आहेत.

माहूर-सारखनी मांडवी रोडवर रात्रीच्या सुमारास गोमांस घेऊन जाणाऱ्या वाहनाचा माहूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी फिल्मीस्टाईने पाठलाग करून बोथ फाट्याजवळ वाहन ताब्यात घेतले. आरोपींविरुद्ध पशु संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एमएच ३१ एफसी ४८६१ या ट्रकचा



पाठलाग करून बोथ फाट्याजवळ येताच सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप व त्यांच्या टीमने अडवला. पण अंधाराचा फायदा घेऊन ट्रकचालक पसार झाला. ट्रकमध्ये ६ हजार किलोमांस आढळले असून ट्रक जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.